अतारांकित प्रश्नोत्तरांची १ ली यादी

महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबईतील कांदिवली येथील साईनगर परिसरात भटक्या श्वानांचे मृतदेह गोणीत भरुन फेकल्याबाबत

(१) १८४ (२६-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली येथील साईनगर परिसरात एका नाल्यात १४ भटक्या श्वानांचे मृतदेह गोणीत भरुन फेकण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी रहिवाशी आणि प्राणी प्रेमींनी या श्वानांच्या शवविच्छेदन अहवालाची मागणी केली असता अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्यामुळे पुढील चौकशीला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाचा तीव्र निषेध म्हणून रहिवाशी व प्राणी प्रेमींनी संबंधित आरोपीचा शोध घेऊन तात्काळ शिक्षा करण्याच्या मागणीसाठी मेणबत्ती पेटवून निदर्शने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित आरोपींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील कांदिवली येथील साईनगर परिसरात ०५ श्वानांचे मृतदेह असल्याबाबत पोलीसांना कळविण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात पोलीसांना गोणीमध्ये भरलेले ०२ श्वानांचे मृतदेह सापडले आहेत.
(२) सदर प्रकरणी ०२ श्वानांचे शवविच्छेदन करण्यात आले असून त्यांच्या मृत्युचे कारण न समजल्याने त्यांचा व्हिसेरा परिक्षणाकरिता रासायनिक विश्लेषक, कलीना, सांताक्रुझ (पूर्व) येथे पाठविण्यात आला असून त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी कांदिवली (पश्चिम)पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे गु. र. क्र. ९७४/२४, भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३२५ सह प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने ०४ साक्षीदारांचा जबाब नोंदविण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपी मिळून न आल्याने सदर गुन्हा "खरा परंतु उघडकीस न आलेला" या शिर्षकाखाली मा. १७ वे न्यायालय, बोरीवली येथे सीसीक्र.२५६/एम/२५, दि.२४.०१.२०२५ अन्वये "अ" वर्गीकरण समरी मंजूर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील विलेपार्ले परिसरात कचरा वेचण्याचे काम करणाऱ्या दोन भावंडांना मारहाण करुन धिंड काढल्याबाबत

(२) ३१५ (२६-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले परिसरात कचरा वेचण्याचे काम करणाऱ्या ६० वर्षीय महिलेच्या दोन अल्पवयीन नातवांना चोरीच्या संशयातून स्थानिकांनी हात-पाय बांधून, त्यांचे केस कापून, लाथा-बुक्यांनी मारहाण करुन परिसरातून धिंड

काढून बेदम मारहाण केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०२५) : (१), (२) आणि (३) होय, हे खरे आहे.

उक्त प्रकरणी जुहू पोलीस ठाणे येथे दि.२३.०९.२०२४ रोजी गु. र.क्र.८९१/२०२४, भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम १२७ (२), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५६ (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६७ सह मुंबई बाल न्याय अधिनियम १९४८ मधील कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ०४ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर आरोपी जामीनावर मुक्त असून त्यांचेवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२६ अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्रत्येक भाग विमानाने जोडण्यासह सध्या अस्तित्वातील विमानतळांचे विस्तारीकरण करण्याबाबत

(३) ५५६ (२७-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक भाग विमानाने जोडण्यासह सध्या अस्तित्वातील विमानतळांचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला गती देण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळांची दिनांक २८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास बैठक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या बैठकीतील निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अखत्यारित असलेल्या विमानतळांच्या विकास/ विस्तारीकरणाकरीता दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत कामे सुरू आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाढवण (ता.डहाणू, जि.पालघर) बंदरानजीक जागतिक स्तरावरील आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारण्याबाबत

(४) ५६६ (२७-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाढवण (ता.डहाणू, जि.पालघर) बंदरानजीक जागतिक स्तरावरील आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रशासनास दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

दि.०६.०१.२०२५ रोजीच्या बैठकीत प्रशासनास निर्देश दिले आहेत.

(२) वाढवण (ता.डहाणू, जि.पालघर) परिसरात विमानतळ उभारणीसाठी व्यवहार्यता तपासण्याकरीता सल्लागाराच्या नियुक्तीसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत निविदा प्रसिध्द करण्यात आली असून निविदा प्रक्रिया सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मालेगांव (जि.नाशिक) येथे पोलीसांनी छापा टाकून हजारो रुपयांचा गुटखा जप्त केल्याबाबत

(५) ७१२ (२६-०४-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) मधील दयाने येथील नवकिरण सायझिंग समोर कुसुंबा रोडवर केजीएन पान टपरीमधून रुपये ८७१ इतक्या रकमेचा गुटखा व शहरातील नवा आझाद नगर भागातील न्यू आझाद हॉटेलमध्ये छापा टाकून रुपये ४८४० इतका विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू पोलीसांनी जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच देवळ्यातील एका किराणा दुकानदारांकडून रुपये ९९११ इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी नाशिक पोलीसांनी मालेगाव शहरात व देवळा येथे गुटखा विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याबरोबर आझादनगर, रमजानपुरा व देवळा पोलीस ठाणे हद्दीतील गुटखा विक्री करण्याऱ्या इसमांवर खालीलप्रमाणे कारवाई करुन एकूण रु. १५,७२३/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे:-

आझादनगर पोलीस ठाणे हद्दीतून एकूण रुपये ४८४०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून गु.र.क्र. ०६/२०२५, भा.न्या.सं. कलम १२३, २२३, २७४, २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका आरोपीस दि.०९.०१.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस दि.११.०१.२०२५ पासून न्यायालयीन कोठडी मंजूर झालेली असून दि.१५.०१.२०२५ रोजी जामीन मंजूर झाला आहे.

रमजानपुरा पोलीस ठाणे हद्दीतून रुपये ९७१/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून गु.र.क्र. २३/२०२५, भा.न्या.सं. कलम १२३, २२३, २७४, २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका आरोपीस दि.१३.०१.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपीस दि.१५.०१.२०२५ पासून न्यायालयीन कोठडी मंजूर झालेली असून दि.१८.०१.२०२५ रोजी जामीन मंजूर झाला आहे.

देवळा पोलीस ठाणे हद्दीतून एकूण रुपये ९९११/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून गु.र.क्र. ०८/२०२५, भा.न्या.सं. कलम २२३, २७४, २७५ अन्वये एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीस दि. ०९.०१.२०२५ रोजी भा.ना.सु.सं.कलम ३५(३) अन्वये नोटीस बजावण्यात आलेली असून सदर गुन्ह्यांचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील विविध सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांविरोधात प्रलंबित असलेले खटले मागे घेण्याबाबत

(६) ७८४ (२६-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील विविध सामाजिक व राजकीय आंदोलनातील माजी व आजी आमदार व खासदार तसेच कार्यकर्त्यांच्या विरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले काढून टाकण्याच्या संदर्भात शासनाने परिपत्रक काढले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सनदशीर मार्गाने बेमुदत आंदोलन, उपोषण करणाऱ्या आंदोलनातील सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांवर पोलीसांनी मुंबई पोलीस अधिनियमाचे तरतुदीखाली गुन्हे दाखल केले होते, हे ही खरे हे काय,
(३) असल्यास, सदर आंदोलनात जिवीतहानी व मालमत्तेचे नुकसान झाले नसतानाही आंदोलकांविरोधी खटले अद्यापपर्यंत काढून टाकण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांविरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले तातडीने मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०२५) : (१) शासन निर्णय, गृह विभाग, दि.२०.०९.२०२२ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये दि.३१.०३.२०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले व उक्त शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तींची पूर्तता होत आहे असे खटले मागे घेण्याबाबत कायदेशीर तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी क्षेत्रिय समित्या गठित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय, गृह विभाग, दि.३१.०७.२०२४ अन्वये दि.३१.०८.२०२४ पर्यंत दोषारोपपत्रे दाखल होतील, असे खटले उक्त दि.२०.०९.२०२२ च्या शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून मागे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. उक्त शासन निर्णय हे संपूर्ण राज्यासाठी लागू आहेत.

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (दिवाणी) (Civil) क्र.६९९/२०१६ (अश्विनीकुमार उपाध्याय वि. युनियन ऑफ इंडिया व इतर) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार ज्या खटल्यांमध्ये विद्यमान व माजी खासदार व आमदार यांचा समावेश आहे, असे खटले मा. उच्च न्यायालयाच्या संमतीशिवाय मागे घेता येणार नाहीत.
(२) हे खरे नाही.

कोणत्याही वैध परवानगीशिवाय अथवा आंदोलना दरम्यान प्रचलित कायद्याचे/आदेशांचे उल्लंघन झाल्यास गुन्हे नोंदविले जातात.
(३) व (४) उक्त नमूद दि.२०.०९.२०२२ व दि.३१.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार निकषांची पूर्तता होत असलेले खटले मागे घेण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय समित्यांमार्फत केली जात आहे. तसेच दि.२०.०९.२०२२ च्या शासन निर्णयातील निकष, क्षेत्रिय समिती व संबंधित सरकारी अभियोक्ता यांनी केलेल्या शिफारशी अनुसरुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ज्या खटल्यांमध्ये विद्यमान व माजी खासदार व आमदार यांचा समावेश आहे, असे खटले शासन मान्यतेनंतर मागे घेणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय यांना प्रकरणपरत्वे कळविण्याची कार्यवाही शासनामार्फत केली जात आहे.

उक्त प्रकरणी पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय आंदोलनातील माजी/आजी आमदार, खासदार यांच्याविरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले एकूण १२ खटले काढून टाकण्याबाबत प्रस्ताव अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.२८.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे शासनास सादर केला आहे. उक्त एकूण १२ खटल्यांपैकी एक खटला वगळून उर्वरित ११ खटले मागे घेण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेने सरकारी अभियोक्ता, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी दि.२०.०३.२०२५ च्या पत्राद्वारे सादर करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी राजकीय व सामाजिक आंदोलनातील कार्यकर्त्यांवर दाखल असलेले खटल्यांपैकी कोणत्याही स्वरुपाचे खाजगी/सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान व जिवीतहानी झालेली नाही असे एकूण २७ खटले काढून टाकण्याबाबत सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता, रायगड-अलिबाग यांना कळविले आहे. तसेच प्रलंबित खटल्यांचा आढावा घेऊन खटले मागे घेण्याची कार्यवाही करण्याची तजवीज पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांनी ठेवली आहे.

तसेच उक्त प्रकरणी पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय आंदोलनातील कार्यकर्त्यांविरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले मागे घेण्याकरिता एकूण २८ गुन्ह्यांपैकी २७ गुन्हे गठीत समितीपुढे ठेवण्यात आले. त्यापैकी शासन निर्णयातील निकषानुसार १६ गुन्हे समितीने मागे घेण्याचा निर्णय घेतला असून, शासन निर्णयातील निकषानुसार अपात्र ७ गुन्हे नाकारण्यात आले असून, सदर गुन्हे न्यायालयात प्रलंबित आहेत. तसेच ४ गुन्हे मागे घेण्याचा निर्णय समितीस्तरावर प्रलंबित असून, त्यावर लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. ०१ गुन्हा न्यायालयातून केस निर्दोषमुक्त झालेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुर्ती (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील ग्रीनफिल्ड विमानतळाचे काम पूर्ण करण्याबाबत

(७) ९३६ (२७-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्ती (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील ग्रीनफिल्ड विमानतळास सन २०१८ मध्ये मान्यता देण्यात येऊन विमानतळाच्या जमीन संपादनाचे काम पूर्ण झाले असून त्यासाठी ४६ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विमानतळास मान्यता मिळून ६ वर्ष पूर्ण होत आले असताना सुद्धा अद्यापही विमानतळाचे काम सुरू न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विमानतळाचे काम तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०२५) : (१), (२) व (३) हे अशंत: खरे आहे.

मुर्ती येथील विमानतळाचा दोन टप्प्यांतर्गत विकास करावयाचा आहे. यासाठी सुमारे ८४० एकर जमीनीची आवश्यकता आहे.

पहिल्या टप्प्यात २८७.८२ एकर खाजगी जमीन + २४६.३८ एकर सरकारी जमीन+१८५.९२ एकर वन जमीन अशी एकुण ७२० एकर जमीन संपादित करण्यासाठी दि.२१.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू. ४६.०० कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे. याअनुषंगाने २८७.८२ एकर खाजगी जमीनीपैकी २३५.५० एकर खजगी जमीनीचे थेट खरेदी पध्दतीने संपादन करण्यात आले असून उर्वरित ५२.३२ एकर जमीनीचे संपादन करावयाचे आहे. २४६.३८ एकर सरकारी जमीन नाममात्र एक रूपया दराने जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरीत केली आहे.१८५.९२ एकर वन जमीनीच्या निर्वानीकरणाचा प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या

स्थायी समितीच्या दि.२९.८.२०२३ रोजीच्या ७४ व्या बैठकीमध्ये सदर प्रस्ताव ना-मंजूर करण्यात आला असल्याचे केंद्र शासन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय (वन्यजीव विभाग), नवी दिल्ली यांनी कळविले आहे. याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कासेगाव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील पोलीस ठाण्याकरीता शासकीय जागा उपलब्ध करुन त्याठिकाणी नवीन इमारत उभारण्याबाबत

(८) १०२१ (२६-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कासेगाव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील पोलीस ठाण्याचे संपूर्ण कामकाज हे अनेक वर्षापासून भाड्यांच्या इमारतीत सुरु असल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावची लोकसंख्या अंदाजे १५ हजार एवढी असून उक्त पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात वाळवा तालुक्यातील नेर्ले, तांबवे, शेणे, भाटवडे, काळम्मावाडी अशी प्रमुख गावे असून गावालगत असलेल्या शेत मळयामध्येही मोठया प्रमाणात लोकवस्ती आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिसरात वारंवार चोरी, दरोडे, अपघात, महिलावरील अत्याचार अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे मोठया प्रमाणात होत असून उक्त स्टेशन पुणे-बेंगलोर या राष्ट्रीय मार्गावर असून त्याठिकाणी कामानिमित्त येणाऱ्या वृध्द, महिला व तक्रारदारांची संख्या मोठया प्रमाणात असून त्यांना पुरेशा जागेअभावी पोलीस स्टेशनबाहेर थांबावे लागत असणे, तसेच पार्किंग या गंभीर समस्यांना स्थानिक नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना अपुऱ्या जागेमुळे दैनंदिन काम तसेच त्यांना स्टेशन नजदीक निवासस्थानाची कोणतीही सोय नसल्याने अनेक अडचणींना सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गट क्रमांक २९६६ या शासकीय जागेवर सदरहू पोलीस ठाण्याची नवीन इमारत, कवायत मैदान, निवासस्थान व पार्किंगकरीता स्थानिकांनी ग्रामपंचायत ठरावाद्वारे पोलीस अधिक्षक, सांगली, तहसलिदार, वाळवा तसेच मा.जिल्हाधिकारी, सांगली यांनी सचिव, सार्वजनिक बांधकाम, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणी पोलीस ठाण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा उपलब्ध करुन देण्यासह त्याठिकाणी नवीन पोलीस ठाण्याची इमारत लवकरात लवकर बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२५) : (१), (२), (३), (४) व (५) होय.

त्यानुषंगाने पोलीस अधीक्षक यांच्या दि.०५/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कासेगांव येथील गट क्रमांक २९६६ मधील सार्वजनिक बांधकाम विभागाचे जागा ही पोलीस ठाणेचे इमारत बांधकाम, कवायत मैदान, जप्त वाहनांच्या पार्किंग करीता मोकळी जागा, महिला व पुरुष कर्मचारी यांचे करीता स्वंतत्र बॅरेक व पोलीस अधिकारी यांचे निवासस्थान तयार करणेसाठी मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन जागेची मोजणी करुन एकूण ०७:०० हेक्टर आर जागे पैकी ४० गुंठे जागा पोलीस दलास वर्ग करणे बाबत जिल्हाधिकारी सांगली यांनी ना हरकत दाखला मिळणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केला आहे.
(६) सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

राज्यभरातील कारागृहांतील पायाभूत सुविधांसह कैद्यांचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत

(९) १०५४ (२६-०४-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात आले असून यामधील तब्बल ७९ टक्के कच्चे कैदी (न्यायाधीन कैदी) असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कैदयाविरोधात विविध न्यायालयात मोठ्या प्रमाणावर खटले प्रलंबित असून, ठाणे आणि येरवडा कारागृहात सर्वाधिक कच्चे कैदी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईतील आर्थररोड कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक वेगवेगळ्या व गंभीर स्वरुपातील गुन्हेगार बंदिस्त असल्याने तेथे सुरक्षेच्या दृष्टीने चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे व त्यामुळे अपुरी जागा, मर्यादित पायाभूत सुविधांसह कैद्यांच्या सुरक्षितेचा अतिरिक्त भार कारागृह प्रशासनावर येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि त्यानुषंगाने राज्यातील कारागृहांतील पायाभूत सुविधांसह कैद्यांचा प्रश्न तातडीने सोडवून विविध न्यायालयांत मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेले खटले निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२५) : (१) व (२) होय.

माहे जानेवारी, २०२५ अखेर राज्यभरातील सर्व कारागृहात दाखल असलेल्या एकूण ३८७९५ बंदयांपैकी सुमारे ३१३५८ इतकी न्यायाधीन बंदयांची (कच्चे कैदी) संख्या आहे.

तसेच, ठाणे मध्यवर्ती कारागृहात दाखल असलेल्या एकुण-३९७६ बंदयांपैकी ३९०२ इतके न्यायाधीन बंदी (कच्चे कैदी) आहेत. येरवडा मध्यवर्ती कारागृहात एकुण - ६३८१ पैकी ५५०४ इतके न्यायाधीन बंदी(कच्चे कैदी) दाखल आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

मुंबई आर्थर रोड कारागृहाची अधीकृत बंदी क्षमता ही ९९९ एवढी असुन १ जानेवारी २०२५ अखेर कारागृहात ३३३३ इतके बंदी दाखल आहेत. बंदयांच्या वाढत्या संख्येमुळे व अपुऱ्या जागेमुळे कैदयांच्या सुरक्षिततेचा अतिरिक्त भार कारागृह प्रशासनावर येत आहे. परंतु कारागृहामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने चिंताजनक परिस्थिती झालेली नसून कारागृहातील दाखल सर्व बंद्यांना प्रशासनाकडून पायाभूत व नियमानुसार देय असलेल्या मुलभूत व इतर सर्व सोई सुविधा पुरविण्यात येत आहे. तसेच सन्मा. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, दिल्ली यांचे प्रतिनिधी यांनी दि. २४.०१.२०२५ रोजी आर्थररोड कारागृहास भेट देऊन पाहणी केली असता सदर कारागृहातील बंद्यांना पायाभूत सुविधा मिळत असल्याचा लेखी अभिप्राय त्यांनी नमूद केला आहे.

(४) राज्यातील कारागृहाकडील अति गर्दी कमी करण्यासाठी शासनाकडुन एकूण ९ ठिकाणी नवीन मध्यवर्ती व जिल्हा कारागृहे बांधणे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे ११ बॅरेक्सची बांधकामे सुरु असून आगामी वर्षात एकूण ९१ बॅरेक्सच्या बांधकामाचे प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यामुळे ४९६० बंद्याची क्षमता वाढेल असा अंदाज आहे.

कारागृहातील दाखल सर्व बंद्यांना प्रशासनाकडून पायाभूत व नियमानुसार देय असलेल्या मुलभूत व इतर सर्व सोई सुविधा पुरविण्यात येत असुन त्या बरोबरच खालीलप्रमाणे देखील सुविधा देण्यात येत आहेत.

i. मुलाखत कक्ष ii.E kiosk iii. Panic Alarm System iv.स्मार्ट फोन (दुरध्वनी सुविधा) v.वॉशिंग मशीन vi.Water cooler With Purifier vii.क्युबीकल्स व्ही.सी. viii.E-Mulakat ix.Full Height Turnstil Gate (Biometric Access System) x.कायदेविषयक समुपदेशन प्रशिक्षण व पुर्नवसन केंद्र xi.वैदयकीय सुविधा (तातडीच्या वेळी)

राज्यातील विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेले खटले निकाली काढण्यासाठी केलेली कार्यवाही खालील प्रमाणे आहे.

i. सन्मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशान्वये न्यायाधीन बंदयांसाठी पुनर्विलोकन समिती (UTRC) सन्मा. जिल्हा व सत्र न्यायालय यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर दरमहा आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

ii. न्यायालयीन प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी राज्यातील कारागृहात ४७८ व्ही.सी. संच कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत. त्याद्वारे जास्तीत जास्त बंदयांना व्ही.सी. द्वारे हजर करुन प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच बंदयांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत कायदे विषयक सल्ला व सहाय्य देण्यात येते. तसेच आवश्यक असल्यास विधी तज्ञांची मदत देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कुक्कुटपालन उद्योगाच्या विकासाकरिता नवीन धोरण ठरविण्याबाबत

(१०) ११०० (२६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भारतीय कृषि क्षेत्राचा अविभाज्य घटक असलेल्या कुक्कुटपालन उद्योगाला गेल्या दीड महिन्यापासून अडचणीना सामना करावा लागत असल्याने नवीन धोरण ठरविण्याची मागणी महाराष्ट्र राज्य पोल्ट्री फार्मर्स ॲण्ड ब्रिडर असोसिएशने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुक्कुटपालन उद्योगाचा विकास व धोरण ठरविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१२-०६-२०२५) : (१) होय, दि. २५.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य पोल्ट्री फार्मर्स ॲण्ड ब्रिडर असोसिएशनकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) कुक्कुटपालन व्यवसाय हा खाजगी व्यवसाय असून, यावर सद्यस्थितीत शासनाचे कोणतेही नियंत्रण नसून नैसर्गिक आपत्ती वगळून इतर कोणत्याही कारणाने या व्यवसायात नुकसान झाल्यास याबाबत आर्थिक मदतीचे शासनाचे कोणतेही धोरण नाही.

तरीही कुक्कुट पालन व्यवसायीकांबरोबरच इतर पशुपालकांना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन व्यवसायास कृषि व्यवसायाचा दर्जा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यात पशुगणना ऑनलाईन पध्दतीने करताना नेटवर्कचा अडथळा येत असल्याबाबत

(११) ११२८ (०८-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात २१ वी पशुगणना सुरु होऊन एक महिना झाला तरी ३४ टक्के पशुगणना झाली असून ही पशुगणना ऑनलाईन सुरु आहे मात्र ज्या ठिकाणी नेटवर्कचा अडथळा होत असल्याने ऑफलाईनद्वारे गणना सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन ऑनलाईन पशुगणना सुरळीत करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१४-०५-२०२५) : (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने विकसित केलेल्या Mobile App मध्येच ऑफलाईन (दुर्गम भागाकरिता) आणि ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. तथापि २१ वी पशुगणना चालु असताना नेटवर्कचा अडथळा झाला नाही. तसेच २१ वी पशुगणना ऑनलाईन पध्दतीने शासनाने विहित केलेल्या मुदतीमध्ये म्हणजेच दि. १४ एप्रिल, २०२५ पूर्वी पूर्ण करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्ती (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील ग्रीनफिल्ड विमानतळाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१२) ११८९ (०८-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्ती (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील ग्रीनफिल्ड विमानतळास मान्यता मिळूनही यासंबंधातील कार्यवाही अतिशय संथगतीने सुरू असून या विमानतळाचा प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाशी संबंधित अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२५) : (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या दि.२९.८.२०२३ रोजीच्या ७४ व्या बैठकीमध्ये सदर प्रस्ताव ना-मंजूर करण्यात आला असल्याचे केंद्र शासन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय (वन्यजीव विभाग), नवी दिल्ली यांनी कळविले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर (जि.लातूर) येथे बर्ड फ्लू या विषाणूजन्य आजारामुळे कावळयांचा मृत्यू झाल्याबाबत

(१३) १२४६ (०८-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे विषाणूजन्य आजारामुळे कावळयांचा मृत्यू झाल्याचा अहवाल भोपाळच्या प्रयोगशाळेकडून प्राप्त झाला असल्याने कावळे दगावल्याची संख्या ५१ वर पोहचली असून सदर ठिकाणची स्वच्छता करण्याच्या सूचना महानगरपालिकेस माहे जानेवारी, २०२५ मध्ये देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बर्ड फ्लू हा विषाणूजन्य आजार असल्यामुळे उदगीरच्या १० किमी परिसरातील पोल्ट्री फॉर्ममधील कुक्कुट पक्ष्यांचे नमुने घेऊन ते पुणे व भोपाळच्या प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात येवून तेथे नागरीकांना जाण्यास प्रतिबंध घालण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवाल प्राप्त झाल्यानंतर आजाराचे विषाणू इतरत्र पसरून नागरीकांच्या आरोग्याला धोका होवू नये याकरिता शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी करुन बर्ड फ्लू हा विषाणूजन्य आजार रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-०६-२०२५) : (१) व (२) होय.

(३) व (४) १. मृत कावळे बर्ड फ्ल्यु या विषाणूजन्य आजाराने बाधित असल्याचे भोपाळ (मध्यप्रदेश) येथील NIHSAD प्रयोगशाळेतील तपासणीत निष्पन्न झाले आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणुन जिल्हाधिकारी लातूर यांनी हुतात्मा स्मारक उद्यान, महात्मा गांधी उद्यान व पाण्याची टाकी नगरपरिषद ही ठिकाणे बाधित क्षेत्र व त्यालगत दहा कि.मी. त्रिज्येतील परिसर सतर्कता क्षेत्र म्हणून घोषित करुन, बाधित क्षेत्रात नागरिकांना प्रवेश प्रतिबंध, स्वच्छता व निर्जंतुकीकरण तसेच सतर्कता क्षेत्रातील कुक्कुट पक्षांचे सर्वेक्षण करण्यास आदेशीत केले आहे.

२. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खालील तातडीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

अ. बाधित क्षेत्रात नागरिकांना प्रवेश प्रतिबंध

आ. बाधित क्षेत्रात सलग तीन दिवस नगरपालिका उदगीर मार्फत सोडियम हायपोक्लोराइट द्रव्यांने फवारणी करुन निर्जंतुकीकरण करण्यात आले.

इ. मृत कावळयांची वनविभाग मार्फत शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात आली.

ई. पशुसंवर्धन विभागाने जिल्हास्तरावरील रॅपिड रिस्पॉन्स पथकाची स्थापना केली.

उ. विभागीय रोग निदान प्रयोगशाळेचे अधिकारी व पशुसंवर्धन विभागातील इतर अधिकारी यांनी तात्काळ भेट देऊन मार्गदर्शन केले.

ऊ. सतर्कता क्षेत्रातील पोल्ट्रीफार्म, परसातील कुक्कुट पक्षी आणि चिकन शॉप मधील कुक्कुट पक्षांचे ४८ व त्यानंतर १४७ नमुने बर्ड फ्ल्यु तपासणीसाठी पुणे येथील रोग अन्वेषण प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. सर्व नमुन्यांचे बर्ड फ्ल्यु साठी निष्कर्ष नकारार्थी आले आहेत.

ऋ. बर्ड फल्यु रोगाबाबत स्थानिक वृत्तपत्रातून जनजागृती करण्यात आली.

(५) लागू नाही.

राज्यात फेसबुक, इंसटाग्राम व इतर सोशल साईटच्या माध्यमातुन इन्स्टंट कर्ज देण्याच्या जाहीरातींना प्रतिबंध घालण्याबाबत

(१४) १३१३ (२६-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फेसबुक, इंस्टाग्राम व इतर सोशल साईटच्या माध्यमातुन इन्स्टंट कर्ज देण्याच्या जाहीराती प्रसिध्द होत असून, या जाहीरातींना बळी पडून अनेक नागरिकांची फसवणूक झाल्याच्या घटना माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२४ दरम्यान मोठया प्रमाणावर घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अश्या पध्दतीच्या जाहीरातींवर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने व नागरिकांची होणारी फसवणूक थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२५) : (१) फेसबुक, इंस्टाग्राम व इतर सोशल साईटच्या माध्यमातुन इन्स्टंट कर्ज जाहीरातींना बळी पडून नागरिकांची फसवणूक झाल्याबाबत सन २०२४ मध्ये राज्यात दाखल गुन्ह्यांची माहिति खालील प्रमाणे आहे.

सन	दाखल गुन्हे	उघड गुन्हे	अटक आरोपी
२०२४	१६	०५	०२

(२) शासनाने नागरीकांची होणारी फसवणूक थांबविण्याच्या दृष्टीने https://cybercrime.gov.in/ या वेब साईटवर व टोल फ्री क्रमांक १९३० यावर आर्थिक फसवणूक झाल्याबाबत तसेच फेसबुक, इंस्टाग्राम व इतर सोशल साईटच्या माध्यमातुन इन्स्टंट कर्ज देण्याऱ्या जाहीरातींना बळी पडणाऱ्या नागरीकांसाठी तात्काळ तक्रार नोंदविण्याचा पर्याय उपलब्ध करुन दिले आहे.

तसेच प्रत्यक्ष संबधीत पोलीस स्टेशन व सायबर पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्याची सुविधा आहे. सायबर विभागातर्फे लोकांची फसवणूक होऊ नये म्हणून वेळोवेळी जनजागृती कार्यक्रम आयोजित करुन नागरीकांना मार्गदर्शन करण्यात येते.

सायबर फसवणूकीच्या प्रकरणांचा तपास जलद गतीने होण्यासाठी तसेच भविष्यात अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी शासनाकडून ठोस उपाययोजना करण्याकरीता महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प हा जागतिक स्तरावरील एक अत्याधुनिक आणि क्रांतिकारी उपक्रम नवी मुंबई, महापे येथील सायबर मुख्यालयात चालू करण्यात आला आहे. राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी येथे नोडल सायबर पोलीस स्टेशनसह सहा प्रमुख विभाग कार्यरत असतील.सदर प्रकल्प राज्यातील सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे नियंत्रणासाठी हा एक अत्याधुनिक केंद्रबिंदू ठरेल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

वेकोलि वणी नॉर्थ येथे सन २०२४-२५ यावर्षात दिलेल्या उद्दीष्टापेक्षा कोळसा उत्पादन कमी प्रमाणात झाल्याबाबत

(१५) १४०६ (०८-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेकोलि वणी नॉर्थ (जि.यवतमाळ) या एकेकाळी कोळसा उत्पादनाच्या उच्चांकी वाटचालीने तिसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या क्षेत्राला सन २०२४-२५ यावर्षी कोळसा उत्पादनाचे ५२ लाख टन उद्दीष्ट देण्यात आले असतांना गेल्या नऊ महिन्यात केवळ २० लाख टन कोळसा उत्पादन झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्षेत्रात एवढ्या कमी प्रमाणात कोळसा उत्पादन होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, वेकोलि वणी नॉर्थ क्षेत्रात देण्यात आलेले कोळसा उत्पादनाचे उद्दीष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (२३-०६-२०२५) : (१) होय. अंशत: खरे आहे.

वेकोली कडून सन २०२४-२५ साठी निश्चित करण्यात आलेल्या वार्षीक ५२ लक्ष टन कोळसा उत्पादनाच्या उद्दिष्टामध्ये वार्षीक ४९.६० लक्ष टन करण्यात आलेल्या सुधारित उद्दिष्टानंतर मार्च, २०२५ अखेर एकूण ४००८४१३ लक्ष टन इतके कोळसा उत्पादन करण्यात आलेले आहे.
(२) वणी नॉर्थ भागात वेकोलीच्या असलेल्या भूमिगत खाणीत जमिनीखालील लांब आणि कठीण प्रवासामुळे (जमीनी खालील प्रवास अंतर सुमारे ४.५ कि.मी., यातील १.६ कि.मी. मैन-रायडिंग ने व उर्वरित पायी) तसेच खुल्या खाणीत कोळश्याचा तीव्र ग्रेडिएंट असल्याने शिवाय पावसाळ्यात पावसाचे पाणी मातीच्या डंपवरुन वाहिल्यामुळे आणि गाळ थेट कोळश्याच्या तोंडावर वाहून आल्याने, गाळ व पाणी बाहेर काढण्यास बराच कालावधी लागल्यामुळे कोळशाचे उत्पादन कमी झाले आहे.
(३) व (४) कोळसा उत्पादन उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी साठलेला गाळ व पाणी काढण्याचे कार्य केले असून, २५० एम हेडचा एक अतिरिक्त पंप संच २५००GPM Dewater करण्यासाठी स्थापित केला आहे.

नवापूर (जि.ठाणे) सेव्हन सी या रिसॉर्टमध्ये एका व्यक्तीची झालेली हत्या

(१६) १४४२ (२६-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.ठाणे) सेव्हन सी या रिसॉर्टमध्ये श्री.मिलिंद मोरे यांची दिनांक ३१ जुलै, २०२४ रोजी हत्या करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२५) : (१) आणि (२) होय, सदर प्रकरणी मिरा भाईंदर व वसई विरार पोलीस आयुक्तालयातील अधिनस्त अर्नाळा सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. २५०/२०२४ बी.एन.एस. १०५,२८१, ७४,१८९(१),१८९(२), १९१(२), ११८(२), ३५२, ३५१(२) प्रमाणे दि.२९.०७.२०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असुन सदर गुन्हयात एकुण १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी एकुण १२ आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईची सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याबाबत

(१७) १८६५ (२९-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत उच्चभ्रू आणि ख्यातनाम व्यक्तींची (Celebrity) वास्तव्य अशी ओळख असलेले वांद्रे असुरक्षित झाले असून अभिनेता सलमान खान यांना मारण्याचा प्रयत्न, माजी मंत्री बाबा सिध्दीकी यांची हत्या आणि सैफ अली खान यांच्यावरील जीवघेणा हल्ला यामुळे खळबळ उडाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यात्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह मुंबईची सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०२५) : (१), (२) व (३) होय, हे अंशतः खरे आहे.

मुंबईत उच्चभ्रू आणि ख्यातनाम व्यक्तींची (Celebrity) वास्तव्य अशी ओळख असलेले वांद्रे असुरक्षित झाले ही बाब खरी नाही. अभिनेता सलमान खान याला मारण्याचा प्रयत्न याप्रकरणी बांद्रा पोलीस ठाणे, बृहन्मुंबई येथे दि.१४.०४.२०२४ रोजी गु.र.क्र. ५७७/२०२४ प्रकरणी भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ३०७, १२०(ब), ५०६(२), २०१, ११५, ३४, भा.ह.का. कलम ३, ५, २५, २५(६), २५(७)(i), २५(८), २५(९), २७ सह म.पो.कायदा कलम ३७(१)(अ), १३५, मोक्का १९९९ मधील कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ०६ आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी ०३ आरोपींचा शोध सुरु आहे. सदर आरोपींविरुध्द मा.विशेष मोक्का न्यायालय, मुंबई येथे दि.०८.०७.२०२४ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर खटला (कोर्ट केस क्र.१३६७/२०२४) न्यायप्रविष्ठ आहे. फौ.दं.प्र.सं. कलम १७३(८) अन्वये अधिक तपास सुरु आहे.

माजी मंत्री बाबा सिध्दीकी यांची हत्या याप्रकरणी निर्मलनगर पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे दि.१३.१०.२०२४ रोजी गु.र.क्र.५८९/२०२४ प्रकरणी भारतीय न्यायसंहिता २०२३ मधील कलम १०३(१), १०९, १२५, ३(५), ३३६(२), ३३७, २३८, ६१(२), शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ३, ५, २५, २५(६), २५(७)(i), २५(८), २५(९), २७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५९ मधील कलम ३७(१)(अ), १३५, संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ मधील कलम ३ (१) (i) (ii), ३(२), ३(३), ३(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात मोक्का कायद्यान्वये एकुण २६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींविरुध्द मा. विशेष मोक्का न्यायालय, सत्र न्यायालय, मुंबई येथे दि.०६.०१.२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मा. न्यायालयाच्या आदेशाने कलम १९३(९) भारतीय न्यायसुरक्षा संहिता अन्वये गुन्ह्याचा पुढील तपास करण्यात येत आहे.

सैफ अली खान यांच्यावरील जीवघेणा हल्ला याप्रकरणी बांद्रा पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे दि.१६.०१.२०२५ रोजी गु. र. क्र.८५/२०२५ मध्ये भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३११, ३१२, ३३१(४), ३३१(६), ३३१(७), भारतात प्रवेशास प्रतिबंध अधिनियम १९४८, मधील कलम ३ (ए), ६(ए), परकीय नागरीक आदेश १९४६ मधील कलम ३(१), १४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

मुंबईची सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

(i) मुंबईची सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी पोलीस ठाणे हद्दीत गस्ती मोबाईल व बिट मार्शल यांची बिट निहाय गस्त ठेवण्यात येते. तसेच मोहल्ला कमिटीची बिटनिहाय बैठक, कॉर्नर मिटींग घेतल्या जातात.

(ii) नियमितपणे पोलीस ठाणे हद्दीतील महत्वाच्या आस्थापना हॉटेल, लॉजेस्, हॉस्पीटल व इतर यांना भेटी देवून तेथील सुरक्षेचा आढावा व तपासणी केली जाते.

(iii) सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तात्काळ चालू करू घेतले जातात.

(iv) पोलीस ठाणे हद्दीतील आईज अॅड इयर सदस्यांची मिटींग घेवून आपले आजुबाजूला संशयित वाहन, वस्तु, नवीन व्यक्ती दिसुन आल्यास तात्काळ पोलीसांना कळविण्याच्या सुचना देण्यात येतात त्यानुसार पडताळणी केली जाते.

(v) पोलीस ठाणे हद्दीत अचानकपणे कोंबिंग ऑपरेशन केले जाते.

(vi) विशेष शाखा व मिल स्पेशल हे वेळोवेळी पोलीस ठाणे हद्दीतील राजकीय व सामाजीक पक्ष / संघटनांची गोपनीय माहिती घेत असतात. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करु शकणाऱ्या इसमांबाबत आगावू माहिती प्राप्त करून त्यांचेविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

(vii) पोलीस ठाणे हद्दीतील समाजकंटक व सराईत गुंडांवर परिणामकारक प्रतिबंधक कारवाई केली जाते. पोलीस ठाणेतील सुप्रभात गस्तीवरील पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच गस्ती वाहने यांचे मार्फतीने पोलीस ठाणे हद्दीतील कोणत्या प्रकारचे आक्षेर्पाह पोस्टर्स बॅनर्स लागणार नाहीत याची दक्षता घेतली जाते.

(viii) मंत्रालय येथे अचानक नागरीक त्यांचे मागण्याकरीता आंदोलने, आत्मदहन व निदर्शने करण्याचा प्रयत्न करतात. सदर ठिकाणी अनुचित प्रकार घडू नये याकरीता गस्त ठेवली जाते.

(ix) पोलीस ठाणेकडून शाळा, कॉलेज येथे गस्त ठेवण्यात येवून पोलीस ठाणे मार्फतीने मुले/मुली यांचेमध्ये सुरक्षा व अंमली पदार्थ संदर्भात जनजागृती मोहिम आयोजीत केली जाते.

(x) संरक्षण शाखेमार्फत अवर्गीकृत संरक्षित व्यक्तींना संभाव्य धोक्याच्या अनुषंगाने संरक्षण पुरविण्यात येते.

(xi) सागरी सुरक्षेच्या अनुषंगाने लॅंडिंग पॉइंट्सवर बंदोबस्त तैनात करण्यात येतो. तसेच सागरी घटकांचा प्रतिसाद तपासण्यासाठी सागरी सुरक्षा अभियान, सी व्हिजिल अभियान, सजग अभियान, ऑपरेशन प्रस्थान असे सुरक्षा अभियान राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या आश्रम शाळांमध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत

(१८) १९६५ (२७-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या आश्रम शाळेत सन २०१२ पासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती झालेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती प्रलंबित असल्यामुळे अपुऱ्या कर्मचाऱ्यांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आश्रम शाळेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याची भरती करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (०५-०६-२०२५) : (१) व (२) खरे आहे.

(३) मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दि.२६.१२.२०२३ अन्वये विजाभज प्रवर्गाच्या १४१ खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेसाठी मंजूर पदांव्यतिरीक्त प्रत्येकी ०२ विषय शिक्षकांची वाढीव पदे, अशी एकूण २८२ शिक्षकांची पदे मंजूर करण्यात आली आहेत. सदर पदांवर कर्मचारी भरतीसाठी क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त अहवालाआधारे शासनस्तरावरून मान्यता देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भटक्या विमुक्त आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे अनुदान वाढवणेबाबत

(१९) १९६६ (२७-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भटक्या विमुक्त समाजातील मुलांसाठी असलेल्या आश्रमशाळांना प्रति विद्यार्थी प्रति महिना १५०० रुपये अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागाई निर्देशांकाप्रमाणे कमीत कमी प्रति विद्यार्थी प्रति महिना रुपये ३ हजार अनुदान मिळण्याची मागणी आश्रमशाळा संस्थाचालक संघाची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भटक्या विमुक्त आश्रमशाळांचे अनुदान वाढविण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भटक्या विमुक्त आश्रमशाळांचे अनुदान वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (०४-०६-२०२५) : (१), (२) व (३) खरे आहे.

(४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दि.१६.०६.२०२४ अन्वये सामाजिक न्याय विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि आदिवासी विकास विभाग या विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात रु.१५००/- वरून वाढ करून रु.२२००/- इतके करण्याबाबत एकत्रितरित्या धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपुर जिल्हयातील पोलीस पाटलांचे थकीत असलेले मानधन मिळण्याबाबत

(२०) २०९३ (२६-०४-२०२५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर जिल्ह्यातील पोलीस पाटील यांचे मानधन मागील ३ महीन्यापासुन मिळालेले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वाढ केलेले पोलीस पाटलांचे मानधन मिळणे सुरु असतांना केवायसी करीता कागदपत्रे मागवुन केवायसी प्रक्रीया वेळेत पूर्ण न झाल्याने मानधन प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन चंद्रपुर जिल्ह्यातील पोलीस पाटलांचे थकीत मानधन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०२५) : (१) व (२) नाही.

सदर प्रकरणी केवायसी प्रक्रियाकरिता आवश्यक कागदपत्रे मागविण्यात आलेले नसून पोलीस पाटील यांचे मानधन अदा करण्याकरिता सीएमपी-डीबीटी प्रणाली लागू करणे अनिवार्य असल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील १००३ पोलीस पाटील यांचे आवश्यक कागदपत्रे मागविण्यात आले होते. त्यापैकी ८४० पोलीस पाटलांचे कागदपत्र प्राप्त झाले असून त्यांची सीएमपी-डीबीटी प्रणाली प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित १६३ पोलीस पाटील यांचे आवश्यक कागदपत्र प्राप्त होताच सीएमपी-डीबीटी प्रणाली प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पोलीस पाटील चंद्रपूर एस. पी. कार्यालयात असलेला निधी वितरीत करण्यात येईल.

(३) पोलीस पाटील यांचे मानधन नियमित वेळेवर अदा करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांची सोशल मिडियावर बदनामी होत असल्याबाबत

(२१) २२५९ (२५-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्याचे स्थानिक लोकप्रतिनिधीसह अनेकांची प्रतिमा समाज माध्यमांसमोर व्हाटसअॅप, फेसबुक, इंस्टाग्रॅम तथा सोशल मिडियाद्वारे काही व्यक्ती सातत्याने बनावट व्हिडीओ, बनावट फोटो तयार करून ऑनलाईनरित्या समाज माध्यमांवर चित्रफित करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लोकप्रतिनिधी हे दारुडे असुन अनेक गैरकृत्य करीत असल्याचे देखील वरील माध्यमावर दाखविण्यात आलेले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांसह अन्य सर्व अधिकारी यांना सदर बाब निदर्शनास आणून कारवाई करण्याची मागणी दिनांक २७ डिसेंबर, २०२४ ते १३ जानेवारी, २०२५ या दरम्यान केली असून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०२५) : (१) व (२), हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) बीड जिल्ह्याचे स्थानिक प्रतिनिधी यांच्याबद्दल सोशल मिडीयावर बदनामीकारक पोस्ट केल्याबद्दल सायबर पोलीस स्टेशन बीड येथे गुरनं ८७/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम ३५६(२), ३(५) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आतापर्यंत २ आरोपींना अटक करण्यात आली आहे व इतर अज्ञात फेसबुक आय.डी. खातेधारक यांची माहिती गुगल मेटा (फेसबुक) कडून येणे प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मा.मुख्यमंत्री महोदयांचे बनावट व्हीडीओ तयार करून सोशल मीडियावर प्रसारित केल्याबाबत

(२२) २२६४ (२५-०४-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे बनावट व्हीडीओ तयार करुन सोशल मिडीयावर प्रसारित केल्याबात १२ खातेदाराविरुद्ध दिनांक २४ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र सायबर सेलने गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित १२ खातेदारांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) दि.२३.१२.२०२४ रोजी तक्रारदार नरीमन पॉइंट येथील भारतीय जनता पार्टी कार्यालयात स्वत:चे ट्वीटर अकाऊंट पाहत असताना ट्वीटर अकाऊंट यूजर्स “bharatbhavalashinde@BSX३B”, “suddhodhansahajra०७४६२९”, Nagpur Congress Sevadal@SevadaINGP, Saurabh Shingh Chauhan@Sbchauhan०१०३, व Mukesh Lavhale@Mukesh Lavhale व इन्स्टाग्रामयुजर्स नामे suressh.kale व फेसबुक युजर्स नामे Prasad Salvi, Varad Kanki, Amol Kambale व Sayed Saleem तसेच यु ट्युब युजर्स नामे THE SMART २३०K, Vishnu Bhotkar असे एकूण १२ सोशल मिडीया धारक यांनी त्यांच्या सोशल मिडीया हँडलवर महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या दि.१९.१२.२०२४ रोजीच्या विधानसभेतील संपूर्ण भाषणाचा अर्धवट व्हीडीओ पोस्ट केला.

नमूद सोशल मिडीया धारक यांनी संगनमत करुन महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संपूर्ण भाषणातील काही अंश प्रसारीत करुन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याविषयी समाजात नाराजी पसरविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच द्वेषपूर्ण वातावरण निर्माण होवून समाजातील दोन गटात दंगल घडवून येवू शकेल अशा आशयाची वातावरण निर्मिती केली. व संशयीत आरोपी यांनी त्यांच्या सोशल मिडीया अकाउंटवर इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करुन व्हीडीओच्या लिंक प्रसारीत केल्या.

तक्रारदार यांच्या जबाबावरुन उपरोक्त प्रकरणी महाराष्ट्र सायबर कार्यालयात दि.२३.१२.२०२४ रोजी गु.र.क्र. २२/२०२४ कलम ३५३(१) (अ), ३५६(२), १९२, ३(५) भारतीय न्याय सांहिता सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील संशयीत आरोपीस दि.०३.०१.२०२५ रोजी अटक करुन त्यास मा.न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले होते. सद्यस्थितीत आरोपी जामीनावर आहे.

तसेच इन्स्टाग्राम, युट्युब, ट्वीटर (एक्स), फेसबुक या सोशल मिडीया प्लेटफॉर्मवर प्रसारीत करण्यात आलेले आक्षेपार्ह व्हीडीओ काढून टाकण्यात आले आहेत व सदर गुन्ह्यातील पुढील तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांकडे ई चलन अंतर्गत थकबाकी येणे प्रलंबित असल्याबाबत

(२३) २५४५ (२५-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी आणि अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी वाहतूक पोलिसांनी सन २०१९ पासून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून ई-चलन सुरू केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत ७ कोटी ५३ लाखांपेक्षा जास्त वाहनचालकांवर ३ हजार ६६७ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. मात्र, त्यापैकी २ हजार ४२९ कोटी रुपयांचा दंड अद्यापही थकीत असून केवळ ३५ टक्के रक्कम वसूल झाल्याची माहिती माहे जानेवारी २०२५ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू दंड तात्काळ वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१९ ते माहे डिसेंबर, २०२४ अखेर मोटर वाहन नियमणाच्या उल्लंघनापोटी एकूण ९,९५,४५,७०६ एवढ्या ई चलान केसेस दाखल करण्यात आल्या असून, सदर चलान दंडाची एकूण रक्कम रु.५८१६,६५,८४,५२२/- इतकी आहे. त्यापैकी ४,४१,३५,९३७ ई चलान केसेसच्या दंडाची रक्कम रु.२१५७,५५,८४,८७२/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच उर्वरित ५,५४,०९,७६९ ई चलान केसेसची दंडाची रक्कम रु.३६५९,१०,००,०५०/- इतकी दंडाची रक्कम वसूल होणे बाकी आहे.
(३) महाराष्ट्र विधि व न्याय सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत जिल्हा स्तरावर दर तीन महिन्यांनी लोकअदालतीचे ई चलान केसेस तडजोडीसाठी दाखल करण्यात येतात. सन २०१९ पासून ते आजपावेतो एकूण १२ लोक अदालतीचे माध्यमातून ९१,७७,९७६ ई चलान केसेस मध्ये रु.५५४,१३,८९,९००/- इतकी दंड तडजोडीच्या स्वरुपात वसूल करण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त कसुरदार वाहनचालकांकडून ई चलान दंड रक्कमेचा जास्तीतजास्त भरणा होण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१) MahaTrafficApp व MumbaipoliceTraffic App अन्वये स्मरण करण्यात येते.
२) बाह्य सरकारी एजन्सी (कॉल सेंटर) द्वारे ई चलानचा भरणा करण्याकरीता स्मरण करण्यात येते.
३) पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्याद्वारे वाहनचालकांना प्रलंबित दंड भरण्याकरीता प्रोत्साहित करण्यात येत आहे.
४) वसुलीसंदर्भात अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.
५) कसुरदार वाहनचालकावर दंड न भरल्यास खटला दाखल करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील भांडुप (पश्चिम) येथील हनुमान नगर येथे रहाणाऱ्या प्रेमी युगुलांनी रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केल्याबाबत

(२४) २८३५ (२७-०४-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भांडुप (पश्चिम) मुंबई येथील हनुमान नगर येथे रहाणाऱ्या प्रेमी युगुलांनी रेल्वेसमोर उडी घेऊन दिनांक २६ जानेवारी, २०२५ रोजी आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुलीच्या कुटुंबियांनी भांडुप पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीत अपहरण केल्याची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर मुलीच्या कुटुंबियांनी भांडुप पोलीस ठाणे येथे दि.२६.०१.२०२५ रोजी तक्रार दिल्याने गु. र. नं.५८/२०२५, भारतीय न्यायसंहिता २०२३ मधील कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सायन-पनवेल महामार्गावर रात्री तृतीय पंथीयांचा त्रास मोठया प्रमाणात होत असल्याबाबत

(२५) २८८३ (२६-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-पनवेल महामार्गावर रात्री अपरात्री फुटपाथवर मोठया प्रमाणात सुरू असलेल्या तृतीय पंथीयांचा त्रास मोठया प्रमाणात वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामार्गावर तृतीय पंथीयांच्या विक्षिप्त हावभावामुळे नागरीकांना विशेषत: महिलांना प्रवास करणे अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी उक्त विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे तृतीयपंथीयांचा त्रास कमी न होता वाढतच आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सायन-पनवेल महामार्गावर रात्री अपरात्री फुटपाथवर फिरणाऱ्या तृतीय पंथी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होताच पोलीस ठाणेमार्फत दोषीविरुध्द प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

सदर बाबतीत FIR दाखल करण्यात आलेला आहे.
(४) तृतीय पंथीचे गुरु श्रीम. मानसी जेना व इतर यांची कळंबोली पोलीस ठाणे येथे दिनांक ०१.०२.२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक कळंबोली पोलीस ठाणे यांनी बैठक घेऊन त्यांना घाणरेडी हावभाव व अश्लील कृत्य न करणेबाबत समज दिलेली आहे.

अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होताच पोलीस ठाणेमार्फत दोषीविरुध्द प्रचलित कायद्यान्वये कायदेशीर कारवाई केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे तेरखेडा (ता.वाशी जि.धाराशिव) येथील तेरखेडा शिवारात धावत्या टेम्पो ट्रॅव्हलरवर चढून चोरट्यांनी केलेली चोरी

(२६) ३०७६ (२६-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तेरखेडा (ता.वाशी, जि.धाराशिव) येथील तेरखेडा शिवारात धावत्या टेम्पो ट्रॅव्हलवर चढून चोरटयांनी २३ तोळयांच्या दागीन्यासह इतर सामानांची चोरी केल्याची घटना दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी रात्रीच्या वेळेस घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी येरमाळा पोलीस स्टेशन ता.वाशी येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आलेली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींविरुद्ध कारवाई करण्यासह अशा घटनांची भविष्यात पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०२५) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी येरमाळा पोलीस ठाणे, जि. धाराशिव येथे दि.२७.१२.२०२५ रोजी गु.र.क्र.३४४/२०२४, भा.न्या.सं. २०२३ कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उक्त प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याकडून एकूण रु. १८,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

तसेच भविष्यात सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणुन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील येडशी टोलनाका-तेरखेडा ते पारगाव टोलनाका- चौसाळा दरम्यान हायवे रोडवर नविन हायवे सेक्टर पेट्रोलींग सुरु करण्यात आली असून त्यासाठी दररोज एक पेट्रोलींग व्हॅन त्यामध्ये एक पोलीस अधिकारी, ०३ पोलीस अंमलदार यांची हत्यारासह नेमणूक करण्यात आली आहे. तसेच चोराखळी पाटी, येरमाळा व घुलेमाळ, वाशी या ठिकाणी दररोज फिक्स पॉईट नेमण्यात येवून दोन्ही ठिकाणी एक पोलीस व्हॅन व दोन पोलीस अंमलदार स्वतंत्रपणे नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच येडशी टोलनाका याठिकाणी दोन पोलीस अंमलदार हे दररोज टोलनाक्यावरील वाहने ट्रॅव्हल्स, मिनीबस, मालवाहतुक वाहने यांचे चालक व प्रवाशी यांना त्यांच्या साहित्याबाबत दक्षता घेण्याकरीता सुचना देवून त्यांना सतर्क केले जात असून रात्रगस्त पेट्रोलींग अधिकारी अंमलदार यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करुन दिले जात आहेत. चोरीच्या घटना वारंवार घडण्याचे ठिकाण पाहणी करुन त्या ठिकाणी पुरेसा उजेड व सीसीटीव्ही कॅमेरा साठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना पत्रव्यवहार केला आहे. तसेच अचानकपणे साध्या वेषात खाजगी वाहनाचा वापर करुन देखील पोलीसांमार्फत पेट्रोलिंग करुन अशा घटना घडू नये यासाठी दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मा.मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर अलंकार पोलीस स्टेशन (जि.पुणे) यांनी एफ.आय.आर. ची नोंद केल्याबाबत

(२७) ३११४ (२७-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये एका २९ वर्षीय महिलेने बलात्कार, आर्थिक व शारिरीक शोषण इत्यादी कारणांकरीता तक्रार दाखल केल्यानंतर सदर गुन्हा हद्दीबाहेर घडल्याचे कारण देऊन पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास नकार दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महिला गुन्हा दाखल करण्याकरिता आल्यानंतर नियमानुसार झिरो एफ.आय.आर. नोंदवावा लागतो हे माहिति असूनही सदर गुन्हा नोंदवण्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी हेतू:पुरस्सर विलंब लावला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी अलंकार पोलिस ठाणे, कोथरुड पुणे पोलिसांनी दहा महिन्यापुर्वी गुन्हा दाखल करण्यास नकार दिल्यानंतर मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार त्याच पोलीस ठाण्याने गुन्हा दाखल करुन घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने झिरो एफ.आय.आर. दाखल करण्याचा आदेश दिल्यानंतर शासनाने चौकशी करुन कर्तव्यात कसूर केलेल्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०२५) : (१) हे खरे नाही.

महिला तक्रारदार यांनी अंलकार पोलीस ठाणे, पुणे शहर येथे तक्रार अर्ज दिला होता. अर्जान्वये अर्जदार व गैरअर्जदार यांचेकडे चौकशी करुन अर्जदार यांना गुन्हा दाखल करणेकामी पोलीस ठाणे येथे बोलाविले असता, अर्जदार यांनी अर्जामध्ये चुकीचा पत्ता दिल्यामुळे व त्या फोन स्विकारत नसल्याने त्यांचेशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे गुन्हा दाखल करता आला नाही.
(२) दि.०४.०१.२०२४ रोजी महिला तक्रारदार यांचे फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द अलंकार पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.क्र. ००/२०२५ भारतीय दंड संहिता चे कलम ३७६ (२), (एन), ३१३, ४०६, ४२० अन्वये दि.०४.०१.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हा पुढील तपासकामी वाई पोलीस ठाणे, जि. सातारा यांचेकडे वर्ग करण्यात येऊन गु.र.क्र.०६/२०२५, भारतीय दंड संहिता चे कलम ३७६(२)(एन), ३१३, ४०६, ४२० अन्वये दि.०५.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही. दिनांक ०४.०१.२०२५ पूर्वी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पोलीसांना गुन्हा दाखल करणेबाबत कोणतेही निर्देश दिलेले नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मु.पो.ता.परळी (जि.बीड) येथील औद्योगिक वसाहतीमधील व्यावसायिकाचे अपहरण केल्याबाबत

(२८) ३१२८ (२७-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो.ता.परळी (जि.बीड) येथील औद्योगिक वसाहतीमधील श्री.अमोल विकास दुबे या व्यावसायिकाचे घरी जात असताना चार व्यक्तींनी कारमधून अपहरण केले असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी ८ ते १० लाख रुपयांचे सोन्याचे दागीने तसेच ३ लाख रोख घेतल्यानंतर रात्री साडे अकराच्या सुमारास दरोडेखोरांनी त्यांना परळी-अंबेजोगाई रस्त्यावरील घाटात सोडून दिल्यानंतर त्यांनी सदर प्रकरणी परळी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०२५) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी, परळी शहर पोलीस ठाणे, जि. बीड येथे गु. र. क्र. १९२/२०२४, भा.न्या.सं. कलम १२६(२), १४०(२), ३०८(३)(४), ३१०(२), ३११, ३५१, ३(५) सह शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या दोन कार, एक दहा तोळे सोन्याचे बिस्कीट व रु. १,१२,०००/- रोख असा एकूण रु. ९,१२,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नाशिक येथील जऊळके-दिंडोरी-चौफुली येथील भुयारी व उड्डाणपूलाच्या सुरु असलेल्या कामामुळे होत असलेले अपघात

(२९) ३७७७ (२७-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिककडून ओझरकडे जाताना दहावा मैल जऊळके-दिंडोरी-चौफुली येथील भुयारी व उड्डाणपूलाच्या सुरू असलेल्या कामामुळे तसेच वाहतूकीचे कोणतेच नियोजन नसल्याने गत महिन्यात सुमारे ३५ नागरिकांना प्राण गमवावे लागले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी वाहतूकीचे नियोजन न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वाहतुकीचे नियोजन करून अपघातग्रस्तांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे कायआहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०२५) : (१), (२) व (३) सदर ठिकाणी भुयारी उड्डाण पुलाचे काम सुरु नाही. तसेच गेल्या महीनाभरात सदर ठिकाणी एकही प्राणांतिक अपघात झालेला नाही, असे पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांचा याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(३०) ३७९१ (०८-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील राज्यात व परराज्यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना देय असलेली मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची रक्कम दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत परराज्यात वैद्यकीय शिक्षण व इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची देय असलेली शिष्यवृत्ती ही नियमित अर्थसंकल्पात तरतूद केली नसल्याने निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी इतर संवर्ग व मुलींप्रमाणे इतर मागास प्रवर्गातील मुलांना देखील पन्नास टक्के शिष्यवृत्ती न देता शंभर टक्के मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्याबाबतची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परराज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती ही ऑफलाइन पद्धतीने सुरु करण्यात आली असल्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निधी अभावी प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती मिळण्यासाठी तसेच सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शंभर टक्के मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती नियमितपणे ऑनलाइन पद्धतीने मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (२७-०५-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील महाराष्ट्र राज्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाडीबीटीमार्फत ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. महाराष्ट्र राज्यातील परराज्यामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती अदा करण्यासंदर्भातील प्रस्ताव माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात आला आहे.

राजगुरूनगर (जि.पुणे) शहरांतील वाडा रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

(३१) ३८१५ (२७-०४-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजगुरूनगर (जि.पुणे) शहरात वाडा रस्त्यावर दोन्ही बाजूला स्टॉल विक्रेते आणि दुहेरी पार्किंगमुळे दिवसभर वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही राजगुरू शहरातील वाहतूक समस्या सुटली नसून केवळ नियोजनाचा अभावामुळे नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) माहे जानेवारी, २०२५ मध्ये सदर रोडचे सिमेट कॉन्ट्रेकचे काम चालू होते त्यामुळे सदर महिन्याचे कालावधीमध्ये राजगुरुनगर शहरात एकेरी वाहतूक करण्यात आलेली होती. माहे जानेवारी, २०२५ मध्ये त्रिमुर्ती कन्ट्रक्शन यांचे मार्फत सिमेंट रोडचे (व्हाईट टॅपींग) कामकाज त्या ठिकाणीचे अंतिम टप्यात असल्यामुळे व सिमेंट रोडचा क्युरींग टाईम पूर्ण न झाल्यामुळे दुहेरी वाहतूक वळविण्यात आलेली होती.
सध्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कमी प्रमाणात झालेला असून खेड नगर परिषद यांचे अतिक्रमण विभाग व पोलीस विभाग यांचे मार्फतीने वेळोवेळी अवैध पथ विक्रेते, स्टॉल विक्रेते व रोडवर वाहने पार्किंग यावर कारवाई करण्यात येत आहे.
(३) खेड नगरपरिषद यांचे मार्फतीने मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे सुचनेप्रमाणे सम व विषम पार्कींग व्यवस्था तयार करण्यात येऊन तशी अधिसूचना तयार करण्यात आलेली आहे. नवीन सिमेंट रोडचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर नगरपरिषद यांचे मार्फत राजगुरुनगर वाडा रोडवर साईन बोर्ड बसवून घेत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गरीब निर्धन आणि गरीब रुग्णांसाठी २०% खाटा राखीव ठेवण्याबाबत

(३२) ४२४२ (२९-०४-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गरीब निर्धन आणि गरीब रुग्णांसाठी २०% खाटा राखीव ठेवण्याच्या सूचना असतानाही उपचार नाकारणाऱ्या धर्मादाय रुग्णालयाच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची पुनर्रचना करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धर्मादाय रुग्णालयातील १० टक्के खाटा निर्धन रुग्णासाठी मोफत तर १० टक्के गरीब रुग्णांसाठी ५०% सवलतीच्या दरात उपलब्ध करून देणे बंधनकारक असतानाही मुंबईसह राज्यातील बहुसंख्य रुग्णालय सर्वसामान्य रुग्णांना दाखल करून घेण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरिबांसाठी राखीव असलेल्या खाटा अन्य रुग्णांसाठी वापरून ही रुग्णालय पैसा कमवत असल्याने या समित्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून धर्मादाय रुग्णालयातील रुग्णालयांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेली समिती या रुग्णालयातील प्रत्येक उपचाराचे दर ठरवून शासनाला त्यांचा अहवाल सादर केला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या अहवालानुसार राज्यभरातील धर्मादाय रुग्णालय आणि इतर रुग्णालयातील रुग्णांना उपचार उपचारासाठीच्या दरपत्रकाचे फलक रुग्णालय आवारात लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०२५) : (१) हे खरे आहे.

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी असलेल्या रुग्णालय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दि.३१/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये व दि.९/०५/२०२४ शासन शुध्दीपत्रकान्वये जिल्हास्तरीय समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे. तसेच सदर समितीवर दि.१४/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

बहुतांश रुग्णालयात मेडीकल सोशल वर्कर रुग्णाचे कागदपत्र तपासून त्यांना दाखल करून घेतात. परंतु काही रुग्णालये रुग्ण दाखल करून घेत नाहीत अशी रुग्णाची अथवा रुग्णाच्या नातेवाईकाची तक्रार जिल्हास्तरीय कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सहायक धर्मादाय आयुक्त (रुग्णालय) यांच्या आदेशान्वये रुग्णालयास पत्र पाठविण्यात येते.
(३) मा.उच्च न्यायालय आदेशित योजनेनुसार स्थापन केलेली जिल्हास्तरीय समिती रुग्णालयातील उपचारांचे दर ठरवत नाहीत तसेच निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी असलेल्या रुग्णालय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दि.३१/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये व दि.९/०५/२०२४ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये पुनर्गठीत जिल्हास्तरीय समितीच्या कार्यकक्षेमध्ये प्रत्येक उपचाराचे दर ठरविणे ही बाब येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील हवामानाच्या नियोजनासाठी विशेष मंत्रालयाची स्थापना करण्याबाबत

(३३) ४२५० (०८-०४-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तापमानात गेल्या २० ते ३० वर्षात कमालीची विसंगती दिसून येत असून हे तापमान सामान्यापेक्षा जास्त नोंदविले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील हवामान तीव्र बदलाचे कारण असून यावर दिर्घकालीन उपायांसाठी राज्यातील हवामानाच्या नियोजनासाठी विशेष मंत्रालयाची गरज असल्याचे मत हवामान क्षेत्रातील तज्ञांनी व्यक्त केले असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हवामानाच्या नियोजनासाठी उष्णतेच्या लाटा किंवा शीतलहरीवर काम करणे अपेक्षित नसून, वातावरण विज्ञान व दीर्घकालीन दृष्टीकोन ठेऊन दीर्घकालीन धोरणे आखायची असतील तर मनुष्यबळ, आर्थिक नियोजन, हवामान तज्ञ यासारखे अभ्यास करणारे मनुष्यबळ असण्याची आवशक्यता असल्याचे मत व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणात होणारे वातावरणीय बदल पाहता राज्यातील हवामानाच्या नियोजनासाठी विशेष मंत्रालयाची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

हवामानाच्या नियोजनासाठी अल्पकालीन तसेच दिर्घकालीन उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

(४) सन २०२० साली प्रशासकीय विभागाचे नामाभिधान "पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग" असे करण्यात आले असून, वातावरणीय बदल अनुकुल धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ०९.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर "राज्य वातावरणीय कृती कक्षाची" स्थापना करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वाशिम येथील जिल्हा कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक कैदयांना ठेवण्यात आल्याबाबत

(३४) ४४०८ (२७-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथे जिल्हा कारागृहात २०० कैदयांना ठेवण्याची क्षमता असतांना तेथे २७० कैदयांना ठेवण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथे कैदयांची संख्या वाढल्याने दैनिक खर्च वाढला असून कैदयांची सुरक्षा व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन प्रशासनाला आवश्यक मनुष्यबळ व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२५) : (१) अशंत: खरे आहे.

वाशिम जिल्हा कारागृहाची अधिकृत बंदीक्षमता १८३ पुरुष व १७ महिला बंदी अशी एकूण २०० बंद्यांची असून सद्यस्थितीत २३५ पुरुष बंदी व १० महिलाबंदी असे एकूण २४५ बंदी कारागृहात बंदिस्त आहेत. त्यापैकी सन्मा. वाशिम जिल्हा न्यायालयाचे क्षेत्रातील १६४ न्यायाधीन बंदी असून उर्वरीत बंदी हे यवतमाळ जिल्हा कारागृहात नविन बॅरेकचे बांधकाम सुरु असल्याने यवतमाळ जिल्हा कारागृहातील बांधकाम पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात वाशिम जिल्हा कारागृहात वर्ग करण्यात आले आहेत. यवतमाळ जिल्हा कारागृहातील बांधकाम पूर्ण होताच सदर बंद्यांना परत त्यांच्या मूळ यवतमाळ जिल्हा कारागृह येथे वर्ग करण्यात येईल.

(२) सद्यस्थितीत कारागृहातील बंदीक्षमता वाढली असल्याने दैनंदिन खर्च काही प्रमाणात वाढलेला आहे. परंतु कैद्यांच्या सुरक्षेकडे व आरोग्याकडे नियमीत लक्ष देण्यात येते. कारागृहात वैद्यकीय उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असून त्यांचेद्वारे बंद्यांवर औषधोपचार करण्यात येतात. आवश्यकतेनुसार कारागृह वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्याने बंद्यास पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे पाठविण्यात येते.

(३) वाशिम जिल्हा कारागृहाच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत श्रेणी-१ दर्जाचे २ तुरुंगाधिकारी, श्रेणी-२ दर्जाचे ३ तुरुंगाधिकारी, १ प्रशासन अधिकारी, १ वैद्यकीय अधिकारी, ४३ रक्षक संवर्गीय कर्मचारी, तसेच ०२ लिपीक संवर्गीय कर्मचारी असे एकुण ५२ अधिकारी / कर्मचारी कर्तव्यावर असून या कारागृहात अधीक्षक ०१ पद, वैद्यकिय अधिकारी ०१ पद, तुरुंगाधिकारी श्रेणी-२ ची ०२ पदे, तसेच ०२ रक्षक संवर्गीय पदे, मिश्रक ०१ पद तसेच लिपीक कर्मचाऱ्यांची ०३ पदे एवढी पदे रिक्त असून मुख्यालय व उपमुख्यालय स्तरावर सदर पदे भरती करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील अल्पवयीन मुले बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ

(३५) ४४४८ (२७-०४-२०२५). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात गेल्या ११ महिन्यात ६० पेक्षा जास्त अल्पवयीन मुले बेपत्ता होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बेपत्ता होणाऱ्या बालकांची खरेदी विक्री होत असल्याचे माहे डिसेंबर २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन भिवंडी शहर पोलीस उपायुक्त व तालुका पोलीस यांनी अशा घटनांना आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) आणि (३) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि.१७.११.२०२४ रोजी गु. र. क्र. १७५२/२०२४ प्रमाणे भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम १३७(२), १४३(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एका मुलाची विक्री झाली असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणी ०३ आरोपींना दि.१९.११.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

अशा घटना घडू नयेत यासाठी पोलीस ठाणे स्तरावरुन मोहल्ला व सोसायटीमध्ये जनगागृती करण्यात येते, वर्दळीच्या ठिकाणी, मुख्य रस्ता, शाळा, महाविद्यालय येथे पोस्टर, बॅनर लावून जनजागृती करण्यात येते, तसेच विविध सामाजिक संस्था/एन्जीओमार्फत वर्षभरात सामाजिक कार्यक्रम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील मौजे खोणी (ता.कल्याण) व मौजे पिंपळास (ता.भिवंडी) येथील जागा खरेदी करुन देण्याच्या नावाने केलेली फसवणूक

(३६) ४४६३ (२७-०४-२०२५). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मौजे खोणी (ता.कल्याण) व मौजे पिंपळास (ता.भिवंडी) येथील जागा खरेदी करून देण्याच्या नावाने फसवणूक केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी भिवंडी तालुक्यातील कोनगाव व कल्याण तालुक्यातील रामनगर पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आल्यानंतरही दोषींना अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी कोनगाव पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि.१०.१२.२०२४ रोजी गु. र. क्र. १०८२/२०२४, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६७, ४६८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दि.३१.१२.२०२४ रोजी आरोपीला अटक करण्यात आली आहे.

रामनगर डोंबिवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दि.२६.११.२०२४ रोजी गु. र. क्र.१०२३/२०२४ भा.दं.वि. मधील कलम ४२०, ४०६, ४०९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(३) कोनगाव पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हयातील आरोपी श्री. अशिष चंद्रकांत शाह यास दि.३१.१२.२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. इतर आरोपींचा शोध व तपास आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्याकडून करण्यात येत आहे.

रामनगर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यातील आरोपींची विविध बॅंकांमधील २३ खाती गोठविण्यात आली असून सदर खात्यातील ९,६३,४३५.८३/-इतकी रक्कम संरक्षित करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील वाढलेली गुन्हेगारी रोखण्याबाबत

(३७) ४४९५ (२७-०४-२०२५). श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी शहरासह कागल, गांधीनगर, शिरोली, हुपरी, आजरा, चंदगड आदी परिसरात गुन्हेगारांच्या टोळ्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढलेल्या गुन्हेगारीमुळे जिल्ह्यात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून वाढलेली गुन्हेगारी रोखण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०२५) : (१) हे अंशतः खरे आहे.

कोल्हापूर जिल्हा कार्यक्षेत्रात दाखल गुन्ह्यांचा आढावा घेऊन सन २०२४ मध्ये इचलकरंजी व गांधीनगर पोलीस ठाणे येथील कार्यक्षेत्रात प्रत्येकी १ टोळी निष्पन्न झाली आहे.

(२) हे खरे नाही.

कोल्हापूर घटकाकडे दाखल गुन्हयांतील आरोपींविरुध्द प्रचलीत कायद्यानुसार वेळीच प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे. प्रचलीत कायद्यातील तरतुदींचा वेळीच व प्रभावी वापर, गुन्हे प्रकटीकरणाचे वाढलेले प्रमाण यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. तसेच असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(३) कोल्हापूर जिल्ह्यातील दाखल गुन्हयांची पार्श्वभूमी, वर्गवारी व कायद्यातील तरतूदी या सर्व बाबी विचारात घेऊन गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सन २०२४ मध्ये करण्यात आलेल्या प्रतिबंधक कारवाईची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

MCOCA	MPDA	म.पो.का. कलम			BNSS कलम		
		५५	५६	५७	१२६	१२९	१२७
१	१	१६	६०	३	१५१९४	७८१	६१

सन २०२४ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे एकूण १२ प्रस्ताव निकाली काढण्यात आलेले असून, १० प्रस्तावांमध्ये ५२ इसमांना हद्दपार करण्यात आले आहे व २ प्रस्तावांमध्ये २५ इसमांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्यात आले आहे.

सन २०२४ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे एकूण ४७ प्रस्ताव निकाली झालेले असून त्यामधील ३२ इसमांना हद्दपार करण्यात आले आहे.

सन २०२४ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५७ प्रमाणे ३ प्रस्तावांपैकी एका प्रस्तावातील इसमास हद्दपार करण्यात आले आहे.

भा.ना.सु.सं.कलम १२६ प्रमाणे १५१९४ प्रस्ताव प्राप्त झाले असून ८३३३ प्रस्तावांमध्ये अंतीम बंधपत्र व ५९१५ प्रस्तावांमध्ये अंतरीम बंधपत्र घेण्यात आले आहे. भा.ना.सु.सं.कलम १२७ प्रमाणे ६१ प्रस्ताव प्राप्त असून ४४ प्रस्तावांमध्ये अंतीम बंधपत्र व १४ प्रस्तावांमध्ये अंतरीम बंधपत्र घेण्यात आले आहे. तसेच भा.ना.सु.सं. कलम १२९ प्रमाणे ७८१ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यामधील ४०३ प्रस्तावांमध्ये अंतीम बंधपत्र व ४०४ प्रस्तावांमध्ये अंतरीम बंधपत्र घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पशुधन विमा योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत

(३८) ४७४८ (२७-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुधन विमा योजना सन २०२० पासून पूर्णपणे बंद झाल्याने जनावरांचा मृत्यू झाल्यास पशुपालकांना मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत शासन हिस्सा ५० व शेतकरी हिस्सा ५० टक्के अशी रक्कम जमा करुन पशुंचा विमा उतरविला जावून नैसर्गिक आपत्ती, आजारपण व इतर कारणामुळे जनावरे दगावल्यास पशुपालकास विम्याची १०० टक्के रक्कम मिळत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना पूर्णपणे बंद झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने उक्त योजना सुरु करण्याची मागणी अनेक पशुपालकांकडून लोकप्रतिनिधींकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन पशुधन विमा योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०६-२०२५) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यात केंद्र पुरस्कृत पशुधन विमा योजना केंद्र हिस्सा ५० व शेतकरी हिस्सा ५० टक्के या तत्वावर राबविण्यात येत होती. तथापी, सदर योजनेंतर्गत सन २०२० पासून केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाला नाही.

(३) व (४) केंद्र शासनाने सन २०२४-२५ पासून सुधारित राष्ट्रीय पशुधन अभियान या योजनेंतर्गत पशुधन विमा योजना जाहीर केली असून सदर योजनेमध्ये केंद्र हिस्सा (५१%), राज्य हिस्सा (३४%) व लाभार्थी हिस्सा (१५%) निर्धारित करण्यात आला आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी विमा कंपनीची निवड करण्यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर या संस्थेकडून निविदा प्रक्रिया कार्यवाही सुरु आहे.

(५) लागू नाही.

लातूर जिल्ह्यातील देवणी गायीच्या संवर्धनाकरिता गोवंश संवर्धन प्रकल्प मंजूर करण्याबाबत

(३९) ४८०३ (०८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील गाय म्हणून ओळखली जाणाऱ्या देवणी गायीचे जतन, संगोपन व संवर्धन होण्याकरीता गोवंश संवर्धन प्रकल्प मंजूर करण्याची मागणी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्र्यांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०२५) : (१) होय.
(२) सन्माननिय वि.स.स. यांनी दि. ०३.०१.२०२५ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समिती, लातूरच्या बैठकीमध्ये "देवणी पशु पैदास केंद्र, लातूर येथेच असावे" ही मागणी केली आहे.

देवणी गोवंशाचे मूळ अधिवास लातूर, बिड, धाराशिव, नांदेड, परभणी इत्यादी जिल्हयामध्ये आहे.

सदर प्रजातीचे संवर्धन करण्यासाठी उपलब्ध जागा विचारात घेवून शासन निर्णय क्र.पविआ-१०२३/प्र.क्र.४५१/पदुम-३ दि.११.१०.२०२३ अन्वये मौजे साकुड ता.अंबेजोगाई जि.बिड येथे देवणी व लाल कंधारी गोवंश जतन व संवर्धन करण्यात येत आहे.
(३) केंद्र शासनाकडून अद्यापपर्यंत सदर प्रकल्प प्रस्तावाला मंजूरी प्राप्त झाली नाही.

खार, मुंबई येथे झालेल्या India's Got Latent Show या कार्यक्रमात अश्लील भाषेचा वापर होत असल्याबाबत

(४०) ५२६१ (२५-०४-२०२५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील खार भागात India's Got Latent Show हा कार्यक्रम होत असून या कार्यक्रमात अश्लील भाषेचा वापर होत असलेचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली अश्लील भाषेचा वापर होत असून या कार्यक्रमात विकृत टिप्पणी करून महिलांच्या प्रतिष्ठेचा अपमान होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने India's Got Latent Show यासारख्या शो व इतर ओटीटी प्लॅटफॉमवर तसेच वाहिनीवर बंदी घालण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२५) : (१) व (२), हे खरे आहे.
(३) व (४) युट्युबर समय रैना यांच्या युट्युब चॅनेल वरील India's Got Latent show या शो मध्ये भारतीय संस्कृती व कुटूंब व्यवस्थेवर परिणाम करणारे, स्त्रियांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव करून अश्लील भाष्य व कृती केल्याचे आढळून आले. तसेच धार्मिक श्रद्धांचा अपमान करून धार्मिक भावना दुखविण्याच्या उद्देशाने बुद्धीपुरस्सर व दृष्ट उद्देशाने कृती केली आहे. तसेच अरुणाचल प्रदेश येथील समाजामध्ये सार्वजनिक शांतता तसेच एकोपा टिकण्यास बाधक अशी कृती केली आहे. सबब, सदर शो चे ज्युरी, शो तयार करणारे व युट्युबवर पोस्ट करणा-यांविरूद्ध नोडल सायबर पोलीस ठाणे,महाराष्ट्र सायबर, मुंबई कार्यालयात गु.र.क्र. ०५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ७९, १९६, २९४, २९६, २९९, ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७ तसेच महिलांचे अश्लील प्रतिनिधीत्व प्रतिबंध कायदा १९८६ कलम ४, ६ व ७ अन्वये दिनांक १०.२.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमाचे व्हिडीओ ओटीटी प्लॅटफॉर्म वरून काढण्यात आलेले आहेत. तसेच सदर प्रकरणातील आरोपी रणवीर अलहाबादिया याने मा.सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन मिळवला असून त्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल असून त्यावर सुनावणी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना देण्यात येत असलेली एक रकमी आर्थिक मदत इतर राज्यांच्या तुलनेने कमी असल्याबाबत

(४१) ५२६४ (२७-०४-२०२५). श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) : सन्माननीय **माजी सैनिक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या वारसांना देण्यात येत असलेली एक रकमी आर्थिक मदत इतर राज्यांच्या तुलनेने कमी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या देण्यात येत असलेल्या १ कोटी रुपयांमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) तसेच स्वातंत्र्योत्तर काळात दि. १५ ऑगस्ट १९४७ ते दि. ३० एप्रिल १९९५ च्या कालावधीत झालेल्या युद्धात/ मोहिमेत शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजनेअंतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता कारगिल निधीतून देण्यात येणारे मासिक अनुदान २०१६ साली निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्या देण्यात येत असलेल्या मासिक अनुदानामध्ये महागाईच्या प्रमाणात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (०४-०६-२०२५) : (१) हे, खरे नाही.

धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या वारसांना देशामधील दिल्ली, गुजरात व पंजाब या राज्यांकडून जास्तीत जास्त रू.१.०० कोटी इतकी आर्थिक मदत देण्यात येते. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०२/०८/२०१९ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र राज्यामधील धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या वारसांना एक रकमी रू.१.०० कोटी इतकी आर्थिक मदत देण्यात येते.

(२) नाही.

(३) हे, खरे आहे.

शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजनेअंतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता कारगिल निधीतून दरमहा रू.१०००/-इतके अर्थसहाय्य देण्यात येत होते. सा.प्र.वि.,शासन निर्णय क्र.मासैम-२०१६/प्र.क्र.९२(३)/२०१६/२८ दि.३० नोव्हेंबर २०१६ अन्वये दिनांक ०१ ऑगस्ट २०१६ पासून दरमहा अर्थसहाय्य रुपये ३०००/- इतके देण्यात येत आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील नंदवन परिसरात तरुणाने शाळेकरी मुलीचा विनयभंग केल्याबाबत

(४२) ५२९१ (२५-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नंदवन परिसरात एका तरुणाने शाळेकरी मुलीचा विनयभंग केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात महिला व तरुणींचा विनयभंग, छेडछाड, लैगिक शोषणचा प्रकारात वाढ होत असल्याने महिला व तरुणींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन अशा प्रकारच्या घटना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०२५) : (१) हे खरे आहे,
(२) व (३) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत तीन वर्ष व फेब्रुवारी, २०२५ पर्यंत महिलांवरील अत्याचाराबाबतचे खालीलप्रमाणे गुन्हे आहेत :-

गुन्ह्याचा प्रकार	**सन २०२२**	**सन २०२२**	**सन २०२३**	**सन २०२३**	**सन २०२४**	**सन २०२४**	**फेब्रुवारी २०२५ पर्यंत**	**फेब्रुवारी २०२५ पर्यंत**
	दाखल	उघड	दाखल	उघड	दाखल	उघड	दाखल	उघड
विनयभंग	३४१	३२९	५०६	४६९	४९९	४८०	९७	९५
बलात्कार	२५०	२४९	२६३	२६२	२९७	२९४	३९	३९
अपहरण	३७०	३७०	४२७	४२७	५३५	४८५	७५	५५

महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने १) महिला व मुलींची छेड काढणारे यांना प्रतिबंध करण्यासाठी निर्भया पथके कार्यरत आहेत. २) सदर पथकामध्ये शाळा, कॉलेज यांना वेळोवेळी भेट देण्यात येऊन महिलांविषयी असणाऱ्या कायद्यांसंदर्भात जगजागृती केली जाते तसेच प्रबोधन केले जाते. ३) वसतीगृह व ग्रामीण भागात असणारी आश्रमशाळा यांना भेटी देऊन त्यांच्या अडचणींबाबत चर्चा केली जाते. ४) पोलीस काका, पोलीस दीदी, निर्भया पथकांमार्फत महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात. ५) पोलीस स्टेशन स्तरावर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. ६) गर्दीची ठिकाणे, मंदिर परिसर, बाजारपेठ, खाजगी शिकवणीच्या ठिकाणांवर निर्भया पथकाद्वारे पेट्रोलिंग करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मंत्रालयातील सचिवांचे स्वीय सहायक असल्याची बतावणी करुन बेरोजगार युवकांची केलेली फसवणूक

(४३) ५३६० (२६-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालयातील सचिवांचे स्वीय सहायक असल्याची बतावणी करुन निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) तीन ते चार बेरोजगार युवकांना नोकरी लावण्याच्या बहाण्याने तब्बल ७१ लाख ५० हजारांची फसवणूक केल्याची तक्रार पंचवटी पोलिस स्थानकामध्ये माहे फेब्रुवारी, २०२५ रोजी दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी पंचवटी पोलीस ठाणे, नाशिक येथे दि.०६.०२.२०२५ रोजी गु. र. क्र. ७३/२०२५ भा.न्या.सं. २०२३, कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विजयगड (त्रिवेणी गड) चौगाव (जि.जळगाव) येथील विकास कामांसाठी निधी मंजुर करणेबाबत

(४४) ५३७२ (२६-०४-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील विजयगड येथे विविध विकास कामांकरिता ४ कोटी ७९ लाख व ४ कोटी ८१ लाख रुपयांच्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी संचालक पर्यटन संचालनालय, मुंबई यांनी मा.सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडे दिनांक २६ जुलै, २०२४ रोजी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने पर्यटन विकास योजना अंतर्गत जळगाव जिल्हयातील विजयगड (त्रिवेणी गड) चौगाव ता. चोपडा येथील विकास कामांसाठी अनुक्रमे रुपये ४ कोटी ७९ लाख व ४ कोटी ८१ लाख निधी मंजुर करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी मा.पर्यटन मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (१२-०६-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
सदर प्रस्ताव प्रादेशिक पर्यटन विकास योजनेच्या राज्य पर्यटन विकास समितीच्या आगामी बैठकीत सादर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कराड-चिपळूण महामार्गावर असणाऱ्या कुंभार्ली घाटात गुरांची अवैध वाहतुक होत असल्याबाबत

(४५) ५८१७ (२६-०४-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड-चिपळूण महामार्गावर असणाऱ्या कुंभार्ली घाटात गुरांची अवैध वाहतुक करणारा ट्रक अलोरे शिरगांव (ता.चिपळूण जि.रत्नागिरी) येथे माहे जानेवारी, २०२५ मध्ये पकडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच, सदर मार्गावर दोन पोलीस स्टेशन तसेच कुंभार्ली घाटात पोलीसांचा तपासणी नाका आणि ठिकठिकाणी महामार्ग पोलीस उभे असताना पोलीस यंत्रणाच आर्थिक देवाणघेवाण करून तस्करीसाठी जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने गुरांची अवैध वाहतूक रोखण्यासह संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर मार्गावर अलोरे-शिरगांव पोलीस स्टेशन तसेच कुंभार्ली घाटात पोलीसांचा तपासणी नाका आणि ठिकठिकाणी महामार्ग पोलीस उभे असतात.
पोलीस यंत्रणा आर्थिक देवाणघेवाण करून तस्करीसाठी जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत नसून अशाप्रकारे वाहतूक करणाऱ्यां विरूध्द कारवाई करण्यात येत आहे.
(४) सदर प्रकरणी गुरांची अवैध वाहतुक करणाऱ्या संबधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

गुन्ह्यातील ६ आरोपी यांना अटक करुन त्यांची ५ दिवस पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त करुन त्यांचेकडे तपास करण्यात आलेला आहे.

आरोपी क्र. २ इकबाल अब्दुलगणी खेरटकर याचे विरुद्ध मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ (अ) (१) अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

आरोपी क्र. १, ३ ते ६ यांचे विरुद्ध बी.एन.एस.एस. कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्टी, विस्तारीकरण, टॅक्सी वे बाबत

(४६) ५८७० (२७-०४-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्टी, विस्तारीकरण, टॅक्सी वे साठी राज्य शासनाने ७३४ कोटी रुपयांची तरतूद केली असून ६८ कोटीचा निधी प्राप्त झाला असतांनाही ना अधिसूचना प्रसिध्द झाली ना विस्तारीकरणाचे काम पुढे गेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिसूचना अद्यापही प्रसिध्द न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दि.२२.११.२०२३ अन्वये या विमानतळाच्या विस्तारीकरणांतर्गत १३९ एकर जमीन संपादनासाठी रु.५७८.२५ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी शासनाकडून आत्तापर्यंत रु.२१७.२३ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.

त्यानुसार २०१३ च्या कायद्याअंतर्गत प्राथमिक स्तरावरील कलम ११ ची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पोलीसांना नवीन घरे व पोलीस ठाण्यांकरीता नवीन इमारत बांधून देण्याबाबत

(४७) ५९७२ (२६-०४-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील कलानगर व जुना बुधवार पेठेतील पोलीस मुख्यालय आणि लक्ष्मीपुरी येथील पोलिसांना नवीन ६७८ घरे लवकरच मिळणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच शहापूर, कुरुंदवाड, कागल आणि कळे पोलीस ठाण्याकरीता नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात येणार असून पोलीस मुख्यालयात पोलीस क्लबलाही मंजुरी मिळाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पोलीसांना नवीन घरे व पोलीस ठाण्याकरीता नवीन इमारत बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२५) : (१) इचलकरंजी कलानगर येथे २१० सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. पोलीस मुख्यालय कोल्हापूर येथील २०४ सदनिकांचे बांधकाम अंतिम टप्यात आहे. जुना बुधवार पेठ पोलीस लाईन येथे १६८ सदनिका सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. लक्ष्मीपुरी पोलीस लाईन येथील ९६ सदनिकांचे बांधकाम अंतिम टप्यात आहे.

(२) शहापूर व कुरुंदवाड पोलीस ठाणेचे बांधकाम पूर्ण झाले आहे. कागल व कळे पोलीस ठाणेचे बांधकामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून सदर दोन्ही बांधकामास Appointment Letter as PMC प्राप्त झालेले आहे. पण अद्याप बांधकाम सुरु झालेले नाही. पोलीस मुख्यालय, कोल्हापूर येथे पोलीस फनबला जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून निधी ही वितरीत करणेत आलेला आहे. पण अद्याप बांधकाम सुरु झालेले नाही. काही विवेचन नाही.

(३) वर नमुद १ व २ प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

करमाळा (जि.सोलापूर) शहरात दिवसेंदिवस चोऱ्यांचे प्रकार वाढल्याबाबत

(४८) ६५९८ (२६-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) शहरातील एसटी बस स्टॅण्ड, शहरातील बाजारपेठ तसेच जेऊर, केम या ठिकाणच्या आठवडी बाजारात गर्दीच्या ठिकाणी दिवसेंदिवस चोऱ्यांचे प्रकार वाढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक पोलीसांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे चोरट्यांकडून दिवसा-ढवळ्या गर्दीचा फायदा घेऊन पाकीट चोरी, मोबाईल, महिलांचे पर्स, दागिने, बसमधील प्रवाश्यांच्या बॅगा इत्यादी चोरीला जात असल्यामुळे महिलांसह नागरीकांत भितीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन करमाळा शहरातील वाढते चोऱ्यांना आळा बसण्यासाठी व सदर चोरट्यांना अटक करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०२५) : (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

करमाळा शहरातील एसटी बस स्थानक व जेऊर बस स्थानक येथे सन २०२४ मध्ये चोरीचे ०६ गुन्हे घडले असून वरील सर्व ठिकाणी संबंधित पोलीस ठाण्यांकडून आवश्यक तो बंदोबस्त पुरविण्यात येत असल्याने महिलांसह नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचे भितीचे वातावरण नाही.

(३) सदर प्रकरणी करमाळा पोलीस ठाणे, जि.सोलापूर येथे एकूण ०६ गुन्हे दाखल असून त्यापैकी ०४ गुन्हे उघडकीस आले आहेत व एकूण ०४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

करमाळा शहरातील वाढत्या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे :-

१. करमाळा शहरातील एस.टी. बस स्थानक येथे चोरी घडू नये यासाठी दररोज ०२ पोलीस अंमलदार यांना स्टॅन्ड ड्युटीकरीता नेमण्यात येते.
२. करमाळा, जेऊर व केम येथील तसेच करमाळा तालुक्यातील सर्व आठवडी बाजारामध्ये नियमितपणे बीट अंमलदार तसेच गुन्हे प्रकटीकरण अंमलदार यांना ड्यूटी नेमण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुण्यातील धर्मादाय सह आयुक्त कार्यालयात सहायक धर्मादाय आयुक्तांची पदे दोन वर्षापासून रिक्त असल्याबाबत

(४९) ६६०० (२६-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील धर्मादाय सह आयुक्त कार्यालयात सहायक धर्मादाय आयुक्तांची २ पदे गेल्या दोन वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे पुणे विभागातील अनेक नोंदणीकृत सार्वजनिक संस्थांचे "चेंज रिपोर्ट" (बदल अहवाल) मंजूरीविना प्रलंबित असल्याने त्याचा फटका संस्थांना बसत असून गैरप्रकार वाढण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त असलेली धर्मादाय सह आयुक्त कार्यालयातील पदे तात्काळ भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०२५) : (१) धर्मादाय संघटनेतील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे या कार्यालयात सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या संवर्गात एकूण ४ पदे मंजूर असून त्यापैकी ३ पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत. सदर पदे -

- दि.०४.०५.२०२३ पासून (तत्कालीन सहायक धर्मादाय आयुक्त-३ यांची प्रशासकीय बदली झाल्यामुळे);
- दि.२०.०२.२०२४ पासून (तत्कालीन सहायक धर्मादाय आयुक्त-२ यांची पदोन्नती झाल्यामुळे);
- दि.२३.०४.२०२५ पासून (तत्कालीन सहायक धर्मादाय आयुक्त-१ यांच्या सेवा न्यायिक सेवेत प्रत्यावर्तित केल्यामुळे) रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

सहायक धर्मादाय आयुक्त-२ या रिक्त पदाचा कार्यभार धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि.१८.०३.२०२४ रोजीच्या आदेशानुसार इतर कार्यरत अधिकारी यांचेकडे विभागून देण्यात आला आहे.सहायक धर्मादाय आयुक्त-३ या रिक्त पदाचा कार्यभार कार्यालयीन आदेश क्र.११६ दि.१२.०५.२०२३ नुसार इतर कार्यरत अधिकारी यांचेकडे विभागून देण्यात आलेला आहे. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त-१ या रिक्त पदाचा कार्यभार कार्यालयीन आदेश क्र.२८९ दि.२३.०४.२०२५ नुसार सहायक धर्मादाय आयुक्त-४ यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.सबब नोंदणीकृत संस्थांचे "चेंज रिपोर्ट" (बदल अहवाल) मंजूरीविना प्रलंबित नसून त्याचे दैनंदिन कामकाज चालू आहे.

(३) रिक्त असणाऱ्या सहायक धर्मादाय आयुक्त पदांवर दि.२८.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये न्यायिक अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने तसेच दि.२९.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्याच्या बदलीने प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण २ रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत.

(४) लागू नाही.

पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील बस स्थानकात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या चोरीबाबत

(५०) ६७०८ (२६-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील प्रवासी जळगाव येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्यांनी पिशवी कापून सुमारे ७ लाख ७ हजार रुपयांचा ऐवज चोरीला असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारोळा बसस्थानकात पोलीस कर्मचारी उपस्थित असतांना अज्ञान चोरट्यांनी ऐवज चोरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०२५) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पारोळा पोलीस ठाणे, जि.जळगाव येथे दि. २९.०१.२०२५ रोजी CCTNS No. १७/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.